**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६००४**

---

क्र. कोविमं/माध्य.परीक्षा/ 360
कोल्हापूर ४१६ ००४.
दिनांक : १०.०६.२०२१

प्रति,

१. मा.विभागीय माहिती उपसंचालक,
माहिती उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर

२. मा.जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी
जिल्हा माहिती व प्रसिध्दी कार्यालय,
सातारा/सांगली/कोल्हापूर

३. मा. संचालक
आकाशवाणी केंद्र, सातारा/सांगली/कोल्हापूर

४. मा.व्यवस्थापक
रेडिओ मिरची व टोमॅटो एफ एम, कोल्हापूर

५. मा. संचालक, बी न्यूज, कोल्हापूर

६. मा. वृत्तपत्र संपादक,
दै. पुढारी/सकाळ/तरूणभारत/लोकमत/लोकसत्ता/पुण्यनगरी/महाराष्ट्र टाईम्स/टाईम्स ऑफ इंडिया
सातारा/सांगली/कोल्हापूर

**विषयः-शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेच्या मूल्यमापन कार्यपध्दतीबाबत ...**

**संदर्भः-राज्य मंडळ जा.क्र.रा.मं./परीक्षा-२/३३७४ दि. ०९.०६.२०११**

महोदय.

शासन निर्णयानुसार सन २०२१ या शैक्षणिक वर्षासाठी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेच्या मूल्यमापन कार्यपध्दतीबाबतच्या राज्य मंडळाच्या संदर्भीय प्रकटनानुसार जाहीर करण्यात आलेली आहे. त्याबाबतचे प्रकटन सोबत जोडले आहे. सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्रातून आणि आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रांनी प्रादेशिक बातम्याच्या वेळी विनामूल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

**आपला विश्वासू,**

**(देविदास कुलाळ)**
**विभागीय सचिव**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.**

सोबत - प्रकटन

प्रत माहितीस्तव :

१. मा.शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर.
२. शिक्षणाधिकारी (माध्य.)जिल्हा परीषद, सातारा / सांगली / कोल्हापूर.
३. सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा , सातारा / सांगली / कोल्हापूर.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४

## प्रकटन

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेच्या मूल्यमापन कार्यपध्दतीबाबत.**

---

सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षासाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत आयोजित करण्यात येणारी माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा कोविड -१९ च्या प्रादुर्भावामुळे उद्‌भवलेल्या असामान्य परिस्थितीमुळे शासन निर्णयानुसार रद्द करण्यात आलेली आहे. तसेच शासनाच्या दि.२८/०५/२०२१ च्या शासन निर्णयानुसार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१०वी) साठी मूल्यमापन कार्यपध्दती जाहीर केलेली आहे.

त्या अनुषंगाने सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार मंडळामार्फत मूल्यमापन प्रक्रिया पूर्ण करण्याचा तपशील, सूचना व वेळापत्रक मंडळामार्फत निश्चित करण्यात आलेले असून त्याची कार्यपध्दती तयार करण्यात आलेली आहे. त्यामध्ये सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात मंडळामार्फत आयोजित करण्यात आलेल्या इयत्ता १०वीच्या परीक्षेसाठी मंडळाकडे नोंदणी केलेल्या नियमित, पुनर्परिक्षार्थी, नाव नोंदणी केलेले खाजगी विद्यार्थी, तुरळक विषय घेऊन प्रविष्ट होणारे परिक्षार्थी तसेच श्रेणीसुधार योजनेअतंर्गत प्रविष्ट विद्यार्थी यांचे मूल्यमापनाबाबतचा तपशील व विषयनिहाय परिशिष्टे याबाबतचे परिपत्रक मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

तरी, सदर मूल्यमापन प्रक्रिया पूर्ण करण्याचा तपशील, सूचना, मूल्यमापनाबाबतचे विषयनिहाय नमुने व वेळापत्रक इ.बाबतचे परिपत्रक व परिशिष्टे याची सर्व माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापक व शिक्षक यांनी नोंद घेऊन आवश्यक कार्यवाही करावी. तसेच शासन निर्णय व उपरोक्त परिपत्रकानुसार इ.१० वीच्या मूल्यमापन कार्यपध्दूती संदर्भात प्रशिक्षणाचा व्हिडीओ मंडळाच्या यु-टयुब चॅनेलवर http://mh-ssc.ac.in/faq या लिंकवर दि.१०/०६/२०२१ रोजी स. ११.०० पासून उपलब्ध करुन दिलेला आहे.

तरी, सर्व माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक व संबंधित शिक्षक यांनी त्यानुसार प्रशिक्षण घेऊन पुढील कार्यवाही करावी.

दि.०९/०६/२०२१

(डॉ अशोक भोसले)<br>
सचिव,<br>
राज्यमंडळ, पुणे -०४